## प्रकरण दुसरे

## भारतातील सहकारी दूध व्यवसायाची रचना

# प्रकरण दुसरे

## भारतातील सहकारी दूध व्यावसायाची रचना

भारतातील सहकारी दूध व्यवसायाची रचना पुढील प्रकारची आहे.

### प्राथमिक दूध उत्पादक संस्था:

भारतातील सहकारी दूध व्यवसाय रचनेतील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे प्राथमिक दूध उत्पादक संस्था होय. या संस्थेचे कार्यक्षेत्र एक किंवा अनेक खेडी एवढे मर्यादित असते. खेड्यातील दूध उत्पादक शेतकरी याचे सभासद असतात. या संस्थांची प्रामुख्याने दोन उद्दिष्टे असतात. एक सभासदांना दूध उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत करणे व दोन दूध व दूधाच्या पदार्थांना किफायतशीर किंमती मिळतील अशी बाजार सुविधा उपलब्ध करणे. भारत सरकारने जेथे सहकारी सेवा संस्था असतील तेथे वेगळ्या दूध उत्पादक सहकारी संस्था स्थापू नयेत असा राज्य सरकारांना सल्ला दिलेला आहे. मात्र जेथे या संस्था परिणामकारक नसतील तेथे दूध उत्पादक सहकारी संस्था स्थापण्यास अशी शिफारस पशुधन व सहकारी दूध व्यवसाय समितीने केलेली होती.

### जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ:

सहकारी दूध रचनेतील मधला दुवा म्हणजे प्राथमिक दूध उत्पादक संस्थांच्या एकत्रीकरणांतून निर्माण झालेले संघ. हे संघ दूध पुरवठा करण्याचे काम करतात. प्राथमिक दूध उत्पादक संस्थानी गोळा केलेले दूध संघाकडे जमा होते. संघामार्फत हे दूध ग्राहकापर्यंत पोचविले जाते. त्याच

प्रमाणे दूधावर प्रक्रिया करणे, सभासद दूध संस्थांच्या सभासदांना दूध संस्थेमार्फत आवश्यक पशुखाद्य पुरविणे, जनावरांसाठी पशुवैद्यकिय सोय उपलब्ध करून देणे इ. कार्ये देखील हे संघ करीत असतात.

राज्य सहकारी दूध उत्पादक संघ:

जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या एकत्रीकरणातून राज्य सहकारी दूध संघाची निर्मिती केली जाते. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र गुजराथ व पंजाब इ. राज्यात राज्य सहकारी दूध उत्पादक संघ कार्य करीत आहेत. जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाना मार्गदर्शन व सर्व प्रकारची मदत करणे, मोठ्या शहरामध्ये दूध वाटपासाठी जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाकडे अधिक दूध उपलब्ध असेल तर ते दूध विक्रीसाठी घेणे तसेच जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाकडून दुग्ध पदार्थ विक्रीसाठी घेणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सहकारी दूध व्यवसाय व बाजारपेठ यांच्यावर नियंत्रण ठेवणे इ. कार्ये राज्य सहकारी दूध उत्पादक संघ करीत असतो.

नॅशनल फेडरेशन ऑफ डेअरी को-ऑपरेटिव्ह:

हा राष्ट्रीय पातळीवर कार्य करणारा संघ असून हा संघ राज्य सहकारी दूध उत्पादक संघाना मदत व मार्गदर्शन करीत असतो. सहकारी दुग्ध व्यवसायाचा विकास करणे, सहकार दुध व्यवसाय व बाजारपेठ यावर नियंत्रण ठेवणे ही या संघाची प्रमुख कार्ये आहेत.

महाराष्ट्रातील सहकारी दूध व्यवसायाची रचना:

भारताप्रमाणेच महाराष्ट्रातील सहकारी दूध व्यवसायाची रचना असून गाव पातळीवर प्राथमिक दूध उत्पादक संस्था सभासदाकडून दूध

गोळा करतात. तेथून ते प्राथमिक दूध उत्पादक संस्थांच्या एकत्रीकरणातून निर्माण झालेल्या तालुका संघापुढे पाठविले जाते. या ठिकाणी दुधाचे शीतकरण होऊन ते जिल्हा संघाकडे किंवा शासकिय योजनेकडे पाठविले जाते. या ठिकाणी आवश्यक ती प्रक्रिया होऊन मागणी प्रमाणे मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या शहरातील ग्राहकांसाठी दुधाचा पुरवठा केला जातो. तसेच शिल्लक राहिलेल्या दुधापासून दुग्ध पदार्थ बनवून ते विक्रीसाठी पाठविले जातात.

ब) <u>सहकारी कायद्यातील कांही महत्त्वाच्या तरतुदी:</u>

सहकारी संस्थांचा कारभार हा सर्वस्वी लोकशाही कार्य पध्दतीवर आधारित आहे. सहकारी संस्था या पूर्णपणे सभासदांच्या असून सभासदांच्यासाठी व सभासदांच्या वतीने कार्य करणा-या एकव्यक्तीभूत संस्था आहेत.

सहकारी संस्थांचा कायदा हा मार्गदर्शक स्वरूपाचा आहे. सहकारी संस्थेचे व्यवस्थापन व दैनंदीन कारभार हा कायदा आणि त्यावरील नियमांच्या चौकटीत तयार करण्यांत आलेल्या संस्थेच्या पोट नियमानुसार चालतो. व चालला पाहिजे. कायद्याच्या आधिन राहून आपल्या पोटनियमात गरजेप्रमाणे सुधारणा करण्याचे स्वातंत्र सहकारी संस्थाना देण्यात आले आहे. सहकारी कायद्यात सभासदांच्या हक्काचे रक्षण करणा-या ज्या महत्त्वाच्या तरतुदी आहेत त्यापैकी कांही पुढील प्रमाणे आहेत.

सहकारी कायदा कलम-१३ प्रमाणे संस्थेला आपल्या पोटनियमात दुरुस्ती करता येईल त्यासाठी --

१) संस्थेच्या पोटनियमात सुधारणा करण्याच्या उद्देशाने

संस्थेची साधारण सभा बोलाविली पाहिजे व अशा सभेत उपस्थित असलेल्या आणि मतदान करणा-या सदस्यांच्या २/३ बहुमताने दुरुस्तीचा ठराव संमत झाला पाहिजे.

२) अशा सभेची नोटीस सर्व सभासदांना योग्यरितीने व पोट नियमात सांगितलेल्या मुदतीत दिली असली पाहिजे. तसेच सदर नोटीस मे. सहाय्यक निबंधक, जिल्हा दूध उत्पादक संघ व संस्थेने ज्यांच्या-कडून कर्ज घेतले असेल त्या संस्थानांही पाठविली पाहिजे.

३) ज्या सभेस पोटनियम दुरुस्तीचा ठराव संमत झाला असेल त्या सभेच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत संमत ठरावाची प्रत मे. सहा. निबंधक यांचेकडे सादर केली पाहिजे व त्या सोबत खालील कागद पूर्तता केली पाहिजे.

अ- सध्याच्या पोटनियमाची शाब्दरचना व दुरुस्ती नंतर होणारी शाब्दरचना व दुरुस्तीची कारणे.

ब- सुधारणा केल्यानंतर सुधारित पोट नियमाची जी शाब्दरचना होईल त्या पोटनियमाच्या चार प्रती अशा प्रतीवर संस्थेच्या पदाधिका-यांच्या सहया असल्या पाहिजेत.

क- पोट नियमात सुधारणा करण्यासाठी बोलाविण्यात आलेल्या सभेच्या नोटीशीची एक प्रत.

ड- सभेची गणपूर्ती संख्या प्रमाणपत्र

ई- मे. सहाय्यक निबंधक त्या बाबतीत मागतील ती इतर माहिती व कागद पत्रे.

पोट नियम दुरुस्ती प्रकरणाचा निकाल मे. सहा. निबंधकांनी ते मिळाल्या तारखेपासून दोन महिन्यात दिला पाहिजे. असा निकाल

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

देणे शक्य नसल्यास त्याची कारणा संस्थेत कळविली पाहिजेत.

कलम २२: सहकारी संस्थेचे सभासद कोणास होता येईल.

१) अ. ज्याचा वयास १८ वर्षे पूर्ण झाली आहेत व ज्याने सभासदत्त्वाबद्दलच्या संस्थेच्या पोट नियमातील अटी पूर्ण केल्या आहेत. अशा संस्थेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही व्यक्तीस संस्थेचे सभासद होता येईल.

ज्याला फौजदारी गुन्ह्याखाली शिक्षा झाली आहे किंवा वेडा आहे अशा इसमास सभासद होता येणार नाही.

ब. कोणतीही कंपनी, पेढी, महामंडळ, भागीदारी संस्था यांना सहकारी संस्थेचे सभासद होता येईल.

क. राज्य सरकार व केंद्र सरकार कोणत्याही सहकारी संस्थेचे सभासद होऊ शकेल.

ड. कोणतीही सहकारी संस्था दुसऱ्या सहकारी संस्थेची सभासद होऊ शकेल.

२) खुले सभासदत्त्व - सभासदत्त्वाबद्दलच्या अटींची पूर्तता करणाऱ्या कोणत्याही इसमास योग्य कारणाशिवाय सभासदत्त्व नाकारता येणार नाही. सभासद करून घेण्यास नकार देण्यात आलेल्या इसमास संस्थेच्या निर्णयाविरुद्ध मे. जिल्हा उपनिबंधक यांचेकडे अपील करता येईल. या संबंधात मे. जिल्हा उपनिबंधक यांनी दिलेला निर्णय अंतिम असेल.

कलम २४: सभासदत्त्वाचे प्रकार - सहकारी कायद्याप्रमाणे सभासदत्त्व तीन प्रकारचे आहेत.

१) सभासद- संस्थेच्या पोट नियमाप्रमाणे ज्याने सभासदत्वाच्या सर्व अटी पूर्ण केल्या आहेत व ज्याला सभासदाचे सर्व अधिकार आहेत.

२) सहकारी सभासद जेव्हा एखाद्या संस्थेचा शेअर (एक शेअर) एकापेक्षा अधिक व्यक्तीनी धारण केला असेल त्यावेळी त्या शेअरची प्रमाणपत्रावर पहिल्या नावानंतर ज्यांची नावे असतील असे इसम.

३) नाममात्र सदस्य म्हणून ज्याला फक्त प्रवेश फी घेऊन संस्थेत दाखल करुन घेण्यात आले असेल असे इसम

नाममात्र सदस्यास संस्थेच्या नफ्यात कोणताही हक्क असणार नाही व त्याला सभासदाचे हक्क व अधिकार असणार नाहीत.

कलम २५: सभासदत्व केव्हा बंद होते --

१) एखाद्या सभासदाने दिलेला राजिनामा संस्थेने स्विकारला असल्यास
२) एखाद्या सभासदाचे संपूर्ण शेअर्स दुसऱ्याच्या नावावर हस्तांतरित करण्यात आल्यास.
३) कलम ३५ प्रमाणे संस्थेतून त्याला हाकलून देण्यात आल्यास
४) सभासद मृत्यू पावल्यास

कलम २७: सदस्याचे मतदानाचे अधिकार

१) सदस्याचे मतदानाचे अधिकार - कोणत्याही सदस्यास एकच मत असेल. परंतु समान मत प्रसंगी सभेच्या अध्यक्षांस एक जादा मत असेल.
२) सभासदास मतदानाचा हक्क व्यक्तिश: बजावावा लागेल.
३) नाममात्र व सहानुभूतीदार सदस्यास मतदानाचा हक्क असणार नाही

कलम २८: शेअर्सधारण करणा-यावर निर्बंध-सरकार, सहकारी संस्था, जिल्हा परिषद यांचे व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्ती सदस्यांस त्या संस्थेच्या एकूण शेअर भांडवलाच्या १/५ किंवा रु. ५०००/- यातील कमी रकमेपेक्षा अधिक रकमेचे शेअर्स धारण करता येणार नाही.

कलम २९: शेअर्सच्या हस्तांतरणावर निर्बंध --

१) कोणत्याही सदस्यांस संस्थेतील त्याचा शेअर त्याने किमान एक वर्षभर धारण केला असल्याशिवाय इतरांच्या नावे हस्तांतरित करता येणार नाही.

२) असे हस्तांतरण फक्त त्या संस्थेच्या सभासदाकडेच करता येईल.

३) ज्याचा राजिनामा स्विकारण्यात आला असेल किंवा संस्थेतून हाकलून काढण्यात आले आहे. अशा सदस्यांचे शेअर्स संस्थेच्या खरेदी करता येतील. परंतु शेअर्स खरेदी पोटी अशा त-हेने परत करावयाची रक्कम ही लगत पूर्वीच्या वर्ष अखेरीस संस्थेच्या जमा-भाग भांडवलाच्या १० टक्के पेक्षा अधिक असता कामा नये.

४) राज्य शासनास संस्थेतील आपले शेअर्स संस्थेस तीन महिन्याची नोटीस देऊन केव्हाही परत काढून घेता येईल.

कलम ३०: सदस्याच्या मृत्यूनंतर हितसंबंधाचे हस्तांतरण --

१) एखादा सदस्य मृत्यू पावल्यानंतर संस्थतीत त्याचे सर्वहित संबंध त्याने नेमलेल्या वारसाच्या नावावर संस्थेने एका वर्षाच्या आत हस्तांतरीत केले पाहिजे.

२) असे हस्तांतरण करण्यापूर्वी त्या वारसास संस्थेचे सभासद करून घेतले पाहिजे.

३) अशा हस्तांतरणाच्या संदर्भात वारस अल्पवयीन असला तरी त्याला सभासद करून घेण्यास कायद्याची अडचण नाही.

४) मयत सदस्याच्या वारसाने संस्थेस सभासद होण्यास नकार दिला व मयत सदस्याच्या संस्थेतील हितसंबंधाची मागणी केली तर संस्थेने कायदेशीर वारसास मयत सभासदाकडून संस्थेस येणे असलेल्या जमा रकमा कपात करून बाकी रक्कम देता येईल.

५) मयत सदस्याने वारस नेमला असल्यास संस्थेच्या पंचकमिटीने मयत सदस्याचा कायदेशीर वारस कोण आहे ते निश्चित करून त्यास वरीलप्रमाणे त्याचा हक्क दिला पाहिजे.

६) वारसासंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याचा निर्णय दिवाणी न्यायालयातून लावून घेतला पाहिजे.

७) सभासदास कोणत्याही इसमाची वारस म्हणून नेमणूक करण्याचा अधिकार आहे.

कलम ११: शेअर जप्तीस पात्र नसणे.

कोणत्याही सदस्याचे सहकारी संस्थेतील शेअर्स, ठेवी, गृहनिर्माण संस्थेच्या कर्ज रोख्यांत गुंतविलेली रक्कम ही कोणत्याही न्यायालयाच्या आदेशानुसार जप्त करता येणार नाही. परंतु सहकारी संस्थेला आपल्या सदस्याकडून येणे, असलेल्या रकमा सदस्याच्या संस्थतील अशा हित संबंधातून वसूल करून घेता येईल.

कलम १२: संस्थेचे दप्तर पाहण्याचा हक्क --

संस्थेचे कोणत्याही सभासदास संस्थेच्या कामकाजाच्या वेळेत --

१) सहकारी कायदा, नियम व संस्थेचे पोट नियम

२) ऑडीटरने तपासलेला वार्षिक ताळेबंद व इतर हिशोबाची पत्रके

३) संस्थेच्या पंचकमिटी सदस्यांची यादी

४) सभासदाचे नोंदणी पुस्तक (नमुना आय रजिस्टर)

५) सर्वसाधारण सभा व कार्यकारी मंडळाच्या सभाचे प्रोसिडींग.

६) सदस्याने संस्थेशी केलेला पत्रव्यवहार किंवा आर्थिक व्यवहार ज्यात नमूद आहे अशा नोंदी, वह्या, कागदपत्र, फाईली इ. वरील सर्व बाबी पाहण्याचा सदस्याला हक्क आहे.

सदस्याने लेखी विनंती केल्यास व त्याबद्दलची फी दिल्यास वर नमुद केलेल्या दस्त ऐवजाची प्रत संस्थेने सभासदाचा अर्ज आल्या तारखेपासून एक महिन्याच्या आत दिला पाहिजे.

फी चे दर प्रत्येक २०० किंवा त्यापेक्षा कमी शब्दास १२ पैसे.

कलम ३३: मृत किंवा माजी सदस्याचे दायित्व (जबाबदारी) --

एखाद्या संस्थेच्या माजी किंवा म्यत सभासदाकडून संस्थेस येणे असलेल्या कर्जाचे दायित्व तो सभासद असण्याचे बंद झाल्या तारखेपासून किंवा मृत्यू पावल्या तारखेपासून दोन वर्ष असेल.

कलम ३५: सदस्याची संस्थेतून हकालपट्टी --

संस्थेच्या हितास बाधक ठरतील अशी कृत्ये केल्याबद्दल किंवा संस्थेच्या नुकसानीस कारण झाल्याबद्दल तसेच संस्थेची बदनामी केल्या-बद्दल अगर संस्थेस अहितकारक ठरतील अशी कामे केल्याबद्दल एखाद्या सभासदास विशेष साधारण सभेत ठराव पास करून संस्थेतून हाकलून काढता येईल.

परंतु अशी कार्यवाही करण्यापूर्वी संबंधित सदस्यास त्याची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली पाहिजे. हकालपट्टीचा ठराव २/३ इतक्या

बहुमताने पास झाला पाहिजे आणि त्या ठरावास मा.जिल्हा उपनिबंधक यांची मान्यता मिळाली पाहिजे तरच तो ठराव अमलात येईल.

अशा त-हेने हकालपट्टी झालेला सभासद त्याच किंवा इतर कुठल्याही संस्थेत एक वर्ष पर्यंत सभासद करुन घेतला जाण्यास पात्र असणार नाही.परंतु संस्थेच्या अर्जावरुन एक वर्षाच्या मुदतीपूर्वी मे. उपनिबंधक अशा इसमास सदस्य म्हणून दाखल करुन घेण्यास संमती देउ शकतील.

कलम ४४: अ) सहकारी संस्थेस तिने आपल्या सभासदास दिलेल्या, १५ वर्षापेक्षा कमी मुदतीच्या कोणत्याही कर्जावर मुद्दलाच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची व्याज म्हणून आकारणी करता येणार नाही.

क) <u>दूध सहकारी संस्थांचे व्यवस्थापन:</u>

सहकारी संस्था या व्यवसाय संघटना असल्यामुळे त्यांचे व्यवस्थापन योग्य प्रकारे होणे आवश्यक आहे. सहकारी संस्था केवळ आर्थिक हितासाठी झटतात असे नाही तर त्या सभासदांच्या भौतिक कल्याणाकडेही लक्ष देतात. पण असे करताना संस्था तोटयात जाणार नाही याची खबरदारी घ्यावी लागते. आपणास असे आढळून येते की, अकार्यक्षम व अपरिपक्व नेतृत्वामुळे सहकारी संस्थांचे व्यवस्थापन ही कौशल्याची बाब आहे. दूध सहकारी संस्थाचे व्यवस्थापन अभ्यासताना त्यामध्ये लागू होत असलेल्या सामान्य व्यवस्थापनाच्या तत्त्वांचा अभ्यास केल्यास सहकारी दूध संस्थाचे व्यवस्थापन सुधारले आहे असे म्हणता येईल. श्री हेन्री फेयॉल यांनी व्यवस्थापनाची तेरा तत्त्वे दिली आहेत ती पुढील प्रमाणे --

१) श्रम विभागणी

२) निश्चीत जबाबदारी
३) शिस्त
४) आदेशातील एक वाक्यता
५) मार्गदर्शनात एक वाक्यता
६) वरिष्ठांची साखळी
७) वेतन
८) अधिकाराचा योग्य समन्वय
९) सार्वजनिक हितास प्राधान्य
१०) समानता
११) प्रेरणा
१२) ऐक्य
१३) प्रशिक्षण

सहकारी व्यवस्थापनाचे घटक:

सहकारी व्यवस्थापनाचे प्रमुख तीन घटक आहेत.

१) सभासद: सभासद होण्यासाठी काही ठराविक गोष्टीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. सभासदास जसे अधिकार मिळतात तशीच काही जबाबदारी असते. सभासदांना साधारणपणे सर्वसाधारण सभेच्या वेळी एकत्र येण्याची संधी मिळते. त्यावेळी त्यांना खालील अधिकार मिळालेले असतात.

अ) संस्थेच्या कामकाजाचे धोरण ठरविणे
ब) वर्षभरात झालेल्या कामास मान्यता देणे
क) कामातील चुकांबद्दल संबंधितावर कारवाई करणे
ड) संस्थेस संचालक व अध्यक्ष निवडणे.

सभासद हे व्यवस्थापनातील अंतीम अधिकार मानले जातात.

२) संचालक मंडळ: साधारण सभेत घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी करण्याची जबाबदारी संचालक मंडळास करावी लागते. संचालक मंडळ सदस्यांचे अंगी व्यवहार दक्षता, कर्तव्यदक्षता, प्रामाणिकपणा, निस्वार्थीपणा, विशालदृष्टीकोन इत्यादि गुण असावेत व त्यात सहकारी चळवळी विषयी आपूलकी असली पाहिजे. संचालक मंडळ आपल्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

कामाच्या सोयीसाठी उपसमित्यांची स्थापना करु शकते.

३) व्यवस्थापक: सहकारी संस्थांच्या कारभारामध्ये व्यवस्थापक किंवा चिटणीस हा प्रमुख घटक आहे. व्यवस्थापकाला संस्थेचे कागदपत्र नियमानुसार ठेवावे लागतात. चिटणीस अकार्यक्षम राहिल्यास त्याचा अनिष्ट परिणाम संस्थेच्या कामावर होतो. म्हणून चिटणीसाची निवड करताना विशेष काळजी घ्यावी, योग्य व कार्यक्षम व्यवस्थापक नेमूण घेण्यासाठी त्याला चांगले वेतन द्यावे.

श्री. व्ही. माथुर यांच्या मते "आधुनिक काळात केवळ घोषणा किंवा प्रचाराने लोकांना सहकारी चळवळीकडे आकर्षित करुन घेता येणार नाही. तर कार्यक्षम व्यवस्थापन करुन चांगले परिणाम दाखवावे लागतील. अयोग्य व्यवस्थापनामुळे संस्था तोटयात येतात व त्यामुळे लोकांचा सहकारी संस्थावरील विश्वास कमी होतो.

## व्यवस्थापन व प्राथमिक दुग्ध सहकारी संस्था:

भारतात पहिल्या दुग्ध सहकारी संस्थेची स्थापना इ.स. १९१३ साली अलाहाबाद (उ.प्रदेश) मध्ये झाली. त्यानंतर बडोदा, बेळगांव धुळे, भागलपूर, हुबळी, बागलकोट, कलकत्ता येथे दूध संस्था स्थापन झाल्या. अर्थात दुग्ध संस्थांची एवढी वाढ पहिल्या व दुसऱ्या महायुध्दात झाली. त्या काळात दूध संघाचीही स्थापना झाली. तथापि दुग्ध सहकारी क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती गुजराथ मधल्या "अमूल" नावाने ओळखल्या जात असलेल्या खेड जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघामुळेच झाली. दूध महापूर योजनेच्या मुलभूत तत्त्वाप्रमाणे दुग्ध व्यवसायाचे सहकारीकरण आणि त्या अन्वये उत्पादन, प्रक्रिया विक्री ही शेतक-यांच्या मालकीच्या सहकारी संस्थानी

करावी असा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. त्यामुळे काही शासकिय दुग्ध योजनाचे हस्तांतरणाही सहकारी संस्थाकडे झाले आहे. परंतु या हस्तांतरणामुळे काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्याचा परिणाम म्हणून काही टिकाकाराकडून दूध महापूर योजना, जिल्हा दूध संघ, प्राथमिक दूध संस्था यांच्या कार्यावर टीका होत आहे. अशा वेळी या संस्थांच्या व्यवस्थापनावरील काही उणीवा पाहून त्यावर उपाय सुचविणे योग्य ठरेल.

दूध सहकारी संस्थांची इतर संस्थाशी सांगड:

सहकारी चळवळीचा विकास वेगाने होत असून दूध सहकारी संस्था व इतर सहकारी संस्था यांचा एकमेकाशी जवळचा संबंध निर्माण झाला आहे. प्राथमिक सहकारी दूध संस्थेच्या सभासदाला, शेती सहकारी संस्था, सहकारी पत संस्था, शेती प्रक्रिया सहकारी संस्था, विविध कार्यकारी सहकारी संस्था, सहकारी पाणी पुरवठा संस्था, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, इतर सहकारी बँका, सहकारी ग्राहक भांडार, यांचा दैनंदिन व्यवहारात लाभ होत आहे. तसेच दूध सहकारी संस्था व इतर सहकारी संस्थांची साखळी निर्माण झालेली आहे.

दूध सहकारी संस्थेच्या सभासदाला दूध संस्थेचा सभासद झाल्यामुळे अनेक सामाजिक राजकिय व आर्थिक फायदे मिळाले आहेत. त्यामुळे प्राथमिक सहकारी दूध उत्पादक संस्थांचा सभासदांच्या विकासात मोलाचा वाटा आहे.

......